PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# महिलांची आर्थिक विकासातील भूमिकेचे अध्ययन

**डॉ. नीता धर्माधिकारी**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

**सारांश:-**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास हा त्या देशातील उद्योग, व्यापार व्यवसायाच्या विकासावर अवलंबून असते. जितक्या जास्त प्रमाणात देशात उद्योग, व्यापाराचा विकास होईल त्याच गतीने देशाचा अधिक विकासही होतो, कारण उद्योग व्यापाराच्या विकासामुळे देशात रोजगाराची संधी वाढते. रोजगाराची संधी मिळाल्यामुळे बेरोजगारांना रोजगार प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. दरडोई उत्पन्नही वाढते व त्यांच्या जिवनस्तर उंचावतो. बेरोजगारांना रोजगार प्राप्त झाल्यास त्यांच्या उत्पन्नात वाढ होते आणि उत्पन्नात वाढ झाल्यामुळे त्यांच्या गरजेत वाढ होऊन परिणामी वस्तूच्या मागणीत (Demand) वाढ होते. मागणीत वाढ झाल्याने व्यवसायाकाला / उत्पादकाला मागणी प्रमाणे उत्पादनात वाढ करावी लागते. उत्पदानात वाढ करण्यासाठी त्यांना पुन्हा व्यवसायाच्या विस्तार व विकास करावा लागतो त्यासाठी उत्पादकाला अधिक श्रम, भांडवल, कच्च्या मालाची गरज असते त्यामुळे बेरोजगारांना पुन्हा रोजगाराची संधी प्राप्त होते, व्यवसायाला भांडवल पुरवठा करणाऱ्यांना (Bank, Financial Cooperation) व्याज प्राप्त होतो, तर कच्चा माल पुरवठा करणाऱ्यांना मालाच्या विक्रीपासून नफा प्राप्त होतो. एकंदरीत औद्योगिक विकासाचा समाजातील प्रत्येक घटकाला (सरकारला-कर, बँकांना-व्याज, बेरोजगारांना-रोजगार, समाजाला-कमी किंमतीत चांगल्या दर्ज्याची वस्तू, उत्पादकाला-अधिक विक्री पासून जास्त नफा प्राप्त होतो.) प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या फायदाच होतो. आणि देशाचा आर्थिक विकासाला चालना मिळते.

व्यवसायाचा विकासामुळे देशाचा आर्थिक विकास होतो ही गोष्ट सत्य आहे. यात शंकाच नाही. परंतु कोणत्याही व्यवसायाचा विकास हा त्या व्यवसायातील कुशल व्यवस्थापनावर अवलंबून असते. व्यवसायात

धोरण ठरविण्याचे कार्य प्रशासन करीत असतो, आणि त्या धोरणाची अंमलबजावणी व्यवस्थापना मार्फत पूर्ण केली जाते. प्रशासनाने कितीही उत्कृष्ट, फायदेशीर, धोरणे आखली असेल पण त्याचा व्यवस्थित अंमलबजावणी होत नसेल तर कोणतेही प्रशासन आपला उद्दिष्ट्य साध्य करू करू शकत नाही. धोरणांचे निट अंमलबजावणीसाठी कुशल व्यवस्थापनाची आवश्यकता असते. आणि एक स्त्रीच उत्तम व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाळू शकते. एक स्त्रीच चांगल्या तऱ्हेने भूमिका बजाऊ शकते. कारण व्यवस्थापनाची कार्य उत्तमरित्या करण्यासाठी त्या व्यवस्थापकामध्ये काही विशिष्ट गुणांची गरज असते किंवा त्या व्यवस्थापकामध्ये काही विशिष्ट गुण असणे गरजेचे असते आणि ते गुण फक्त स्त्रियांमध्येच पहायला मिळतात. स्त्रियांची भूमिका आर्थिक विकासात कशी महत्वाची आहे, याचे अध्ययन प्रस्तुत पेपरमध्ये केले आहे.

**मूळशब्द:-** रोजगार, संधी, व्यवसाय, आर्थिक विकास.

## प्रस्तावना:-

एका यशस्वी व्यवस्थापकामध्ये उमेद व्यक्तिमत्व, तांत्रिक ज्ञान, कौशल्य, चारित्र्य, वेळेचे यशस्वी नियोजन, काम करवून घेण्याची कला, दूरदर्शित्व, निर्णय क्षमता, चौफेर वाचन, ई. गुणांची आवशक्यता असते. वरील सर्व गुण स्त्री व्यवस्थापकामध्येही असते. परंतु एका व्यवस्थापकासाठी सर्वात महत्वाचे गुण ते म्हणजे काटकसर , चिकाटी, आपुलकी, मातृत्व, ई. गुण फक्त स्त्रियांमध्येच असते. असे असूनसुद्धा आज स्त्रियांना व्यवस्थापनात स्थान दिले जात नाही. कारण भारतीय संस्कृती पुरुष प्रधान आहे. स्त्रियांना पाहिजे तसा मान दिला जात नाही स्त्रियांना चुल आणि मुल इथपर्यंतच मर्यादित ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. भारतीय संस्कृतीत पुरुषांनी हुकुम द्यायचा आणि ते स्त्रियांनी स्विकारायचे असे दिसते. स्त्रियांनी दिलेले आदेश पुरुष खपवून घेत नाही. परंतु आज काळ बदलेला आहे आणि बदलत्या काळानुसार स्त्रियांना त्यांचा अधिकार मिळायलाच पाहिजे.

स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये वर्तमानस्तिथीत फरक करून चालणार नाही. भारतीय संविधानानुसार समान नागरी कायद्याचे पालन झालाच पाहिजे, स्त्रियांनी व्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग करुन घ्यायला पाहिजे स्त्रिया उच्च पदावर कार्य करू शकत नाही किंवा त्यांना व्यवस्थापनाचे कार्य जमणार नाही ही मानसिकता पुरुषांनी बदलायला पाहिजे. कारण असे अनेकदा उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहेत की ज्या स्त्रियांनीही व्यवस्थापनाची उत्तम भूमिका निभावलेली आहे. याशिवाय व्यवसाय क्षेत्रात महिला गृह उद्योग, लिज्जत पापड, ई. मध्ये महिलांनी उत्कृष्ट कार्य केली आहेत उदा. उद्योगात जसवंतीबेन पोपट, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात

किरण मुजुमदार शॉ, Financial & Banking क्षेत्रात किदवई, पोलीस खात्यात किरण बेदी, पत्रकारितेत बरखा दत्त, वैद्यकीय क्षेत्रात टेस्ट ट्यूब बेबी चे जनक डॉ. इंदिरा हिंदुजा, टेलीविजन क्षेत्रात एकता कपूर, साहित्य क्षेत्रात महाश्वेतादेवी, संगीत क्षेत्रात आशा भोसले, लता मंगेशकर अशा प्रकारे जवळपास सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा वर्चस्व दिसून येतो. स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्यास सक्षम आहेत म्हणून त्यांना व्यवस्थापनातही स्थान दिले पाहिजे.

**अध्ययन उद्देश:-**

१. स्त्रियांची भूमिका अभ्यासणे.

२. आर्थिक विकासात स्त्रियांचा सहभाग अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:-** हा पेपर पूर्णत: दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे.

**गृहीतक:-** महिलांचा व्यवस्थापना मधील सहभागाने आर्थिक विकासाची गती वाढेल.

**स्त्रीभूमिका:-**

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उद्धार करी हा अनुभव पदोपदी येतो. १९४८ साली मा. ज्योतीबा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवून, सुशिक्षित करून त्यांच्याद्वारे पाठ्यशाळा सुरु करून स्त्रियांना एक ज्ञानाचे नवीन दालन उघडून दिले .पुरुषप्रधान संस्कृतीत जन्माला आल्यापासून मुलगा व मुलगी हा भेदभाव तीव्र असतो. आपल्याही घरात हा नियम दिसतो. घरात आईवडील यात वडिलांची वागणूक अशीच असते. वर्तमान आव्हाने स्वीकारण्याकरिता विविध क्षेत्रात व्यवस्थापनात स्त्रियांचा सहभाग आवश्यक आहे. स्त्रिया व स्वयंपाकघर हे समीकरण मागे पडले आहे. इंजिनियरिंग, विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, गुहउद्योग, एअर इंडिया, खेळ, रेल्वे चालक, (ऑटो चालक) , ई. क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग आहे. कस्तुरबा गांधी, सावित्रीबाई फुले, झाशी राणी लक्ष्मीबाई, ई. नी उत्तम प्रशासन कार्य केले आहेत. अंतराळविर स्व. कल्पना चावला, नेमबाजी अंजली भागवत, सानिया मिर्झा, शारदा उद्योग, किर्लोस्कर, अमृता पटेल, आनंद डेअरी, बनारसे यांचे लंडन मध्ये प्रसिद्ध हॉटेल, लिज्जत पापड उद्योग दिसून येते. त्यामुळे हे लक्षात येते कि, स्त्रिया ह्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्यास सक्षम आहेत. स्त्रीयांमुळे कुटुंबाला जे चांगले वळण लागते, तसेच वळण उद्योगाला लावता येते. कारण शिस्त, निटनेटकेपणा, अचूकता, काटकसर, प्रामाणिकता, नियंत्रण, योग्य धोरण बनविणे हे गुण स्त्रियांमध्ये दिसतात. त्यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेची प्रगती स्त्रीयांमुळे होऊ शकेल.

**समस्या:-**

**१. भांडवल समस्या:-** उत्पादन कार्याकरिता लागणारे भांडवल पुरेसे नसल्याने कार्यात समस्या निर्माण होतात. अनियमितता त्यामुळे वाढेल व कार्य क्षमता घटेल व उद्योग बंद पडू लागतील.

**२. संस्थागात वित्तीय सोयींचा अभाव:-** अजूनही वित्तीय पुरवठा करणाऱ्या संख्या प्रयाप्तपणे सेवा देऊ शकत नाही. त्यामुळे जास्त दराने कर्ज घेतल्यामुळे आर्थिक स्तिथी खालाविले. या सोयीअभावी महिला पुढे येण्यास तयार नसतात.

**३. आरोग्य समस्या:-**महिला ज्या ठिकाणी काम करतात त्याठिकाणी सोयींचा सुविधांचा अभाव असतो. पुरेशी हवा, सूर्यप्रकाश, पाणी प्रसाधनगृहे याकडे लक्ष दिले नाही तर त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. आरोग्यामुळे प्रशासनावरही परिणाम होईल.

**४. दारिद्य आणि अशिक्षितपणा:-** शिक्षणाचा स्तर निम्म प्रतीचा आहे. प्रशासना करिता नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज असते. पण, पैश्याअभावी ते शक्य होऊ शकत नाही.

**५. बाजारपेठ समस्या:-** गृहउद्योग, कुटीर उद्योग मार्फत तयार वस्तूंना योग्य भाव मिळणे गरजेचे आहे. वाहतूक, पर्यटन, बाजार पेठा ई. च्या अभावामुळे विक्रीस समस्या उद्भवते.

**६. बालसंगोपन गृह अभाव:-** ज्याठिकाणी महिला काम करत असतात त्याठिकाणी बाल संगोपन गृहाची गरज असते, परंतु त्याचाही अभाव आहे. अजूनही भारतात पहिजे त्या प्रमाणात बाल संगोपन गृह सुविधा नाही. परिणामत: प्रशासन कार्यावर परिणाम होतो.

**स्त्रियांना व्यवस्थापनात सहभाग केल्यामुळे मिळणारे फायदे:-**

**१. स्त्रियांना अधिकाराची प्राप्ती:-** स्त्रियांना व्यवस्थापनात सहभाग केल्यामुळे त्यांना त्यांच्या अधिकार प्राप्त होतील. कारण स्त्रियांमध्ये यशस्वी व्यवस्थापकासाठी सर्व आवश्यक गुण असूनसुद्धा फक्त ती एक स्त्री आहे म्हणून तिला व्यवस्थापनात समविष्ट न करणे आजच्या युगामध्ये योग्य वाटत नाहीत. तिला पण व्यवस्थापनात सहभाग होण्याचा अधिकार आहे. कारण त्या पदाकरिता तिच्याकडे सर्व पात्रता आहेत. जर स्त्रियांना व्यवस्थापनात स्थान दिला तरच तिच्या पात्रतेचा सम्मान होईल. म्हणून प्रत्येक स्त्रियांना त्यांनी धारण केलेल्या पात्रतेनुसार त्या त्या पदावर कार्य करण्याचा अधिकार आहे.

**२. स्त्रियांना आदराची वागणूक:-** स्त्रिया उच्च पदावर पदासिन झाल्यामुळे त्यांच्या प्रति प्रत्येकाच्या मनामध्ये आदरेची भावना जागृत होईल व त्यांना समाजात मान मिळेल. त्यामुळे इतर स्त्रियांना प्रेरणा मिळेल व त्यापण उच्च शिक्षण प्राप्त करून विशिष्ट पद प्राप्त कारण्याचा प्रयत्न करतील.

**३. मुलींच्या बाल मृत्युदर कमी होईल:-** स्त्रियांना व्यवस्थापनात सहभाग केल्यामुळे समाजातील लोकांचे स्त्रियांबाबत मानसिकता बदलेल त्यामुळे मुलींच्या बाल मृत्युदर कमी होऊन स्त्री-पुरूषांचे प्रमाणात असमतोल दूर होईल २०११ ला भारतात दर हजार मुलांपैकी बालिका संख्या ९३३ होती त्यामुळे ही तफावत दूर होईल.

**४. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील:-** आज भारतातील स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहावे लागते आणि याच गोष्टीचा गैरफायदा पुरुष घेतात. परंतु स्त्रियांना व्यवस्थापनात सहभागी करून घेतल्यास त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील.

**५. स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढेल:-** समाजात स्त्रियांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराची संधी मिळण्याने स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढेल. त्याचप्रमाणे बाल विवाह, आत्महत्या, अत्याचार, ई. सारखी अनिष्ठ प्रथा थांबविण्यास मदत होईल.

**६. मुलगा-मुलगी भेद कमी होईल:-** स्त्रियांना समाजात विशिष्ट स्थान मिळाल्यामुळे समाजातील लोकांच्या मानसिकतेत बदल होऊन अपत्याबाबद मुलगा-मुलगी भेद नष्ट होईल.

**७. व्यवसायात अचूक निर्णय:-** स्त्रियांना उद्योग व्यवस्थापनात सहभाग केल्यामुळे पुरुषांच्या तुलनेत अचूक व शीघ्र निर्णय घेण्यात येते ई. कारण स्त्रियांमध्ये एक विशिष्ट गुण असते ती गुण म्हणजे त्यांना घर चालविण्यासाठी रोज निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे त्यांना आधिपासून निर्णय घेण्याची सवय असल्यामुळे अचूक निर्णय घेऊ शकतात.

**८. कर्मचाऱ्यांचा मनोधैर्यात वाढ:-** एक स्त्री व्यवस्थापक असल्यामुळे ती कर्मचाऱ्यांची विशेषत: स्त्री कामगारांची मनोव्यथा जाणून घेईल, त्यांच्या समस्यांचा निपटारा झाल्याने ते समाधानी होतील.

**९. उद्योगांची कार्यक्षमता वृद्धी:-** स्त्रिया कामच्या संबंधित चोख, तत्पर असल्याने त्यांच्यामुळे तेथील उद्योगांची कार्यक्षमता वाढेल. कुराळ, कार्यक्षम नेतृत्वामुळे  व्यवसायाची भरभराट होईल.

**१०. कार्यविभाजन:-** जबाबदारीची विभागणी झाल्याने कामाची गती वाढेल. पुरुषांवर कामाचा भार पडणार नाही.

**११. कृषी क्षेत्रात प्रगती:-** कृषीमध्ये काम करणाऱ्या स्त्री मजूर असल्याने कृषी उत्पादन वाढेल. कृषी विद्यापीठात संशोधनातही महिला अग्रेसर आहेत.

**१२. कृषी विद्यापीठ सहभाग:-** कृषी विद्यापीठातही विद्यार्थी ॲडमिशनमध्ये राखीव जागा विद्यार्थिनींना असल्याने महिला कृषी संशोधकांची संख्या वाढेल व त्यांच्या ज्ञानामुळे राष्ट्राचा विकास होईल.

**१३. बचतगट:-** बचत गटांची भूमिका महिलांच्या प्रगतीचे मापक आहे. कुकुटपालान, मेंढीपालन, गृहउद्योगांमध्ये महिलांची संख्या वाढल्याने रोजगारही वाढेल, व उद्योगांद्वारे त्यांच्याही विकास होईल.

**ग्रामीण भागातील योजना:-**

**१. औदोगिक कलाकृती केंद्रे:-** असंघटीत क्षेत्रातील कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी ITI विभगाद्वारे तंत्रज्ञान विकसित करून महिला कारागिरांना प्रोत्साहन देणे व उत्पादनाचा दर्जा प्राप्त करून, बाजारपेठेत विक्रीसाठी प्रयत्न करणे

**२. हस्तकला उद्योग विकास योजना:-** प्राचीन काळातील या कला ग्रामीण भागात दिसून येते. याद्वारे महिलांचा विकास करण्यासाठी मानव संसाधन विकास, हस्तकला उद्योग कारागीर कल्याण योजना राबवून अर्थव्यवस्थेत महिलांचा योगदान वाढविले जाते.

३. सफाई, गवंडी कामगार, घरगुती गृहउद्योग, दुग्ध व्यवसाय, टेलरकाम, चांभार, लोहार, मध गोळा करणे ई. व्यवसायात महिला कामगारांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी सामाजिक विमा योजना लागू झाली.

**४. ग्रामीण उद्योजकता विकास:-** लघु व कुटीर उद्योगांना गती देण्यासाठी शासनाद्वारे पंचवार्षिक योजनांमध्ये तरतुदी केल्या आहेत.

**उपाय:-**

**१. महिला बाल विकास विभाग:-** महिलांना प्रशिक्षित करून रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे व आर्थिक विकास करणे या विभागाचा उद्देश आहे. स्वयंसहायता बचतगटला वाव देणे, कौशल्यावर आधारित उद्योजकता प्रशिक्षण देणे, व्यवसायासाठी मार्गदर्शन व विपणन व्यवस्था कार्य विकासाद्वारे केले जातात.

**२.बाल संगोपन गृह:- १९९५-९६:-** बाल संगोपन कार्यक्रम ग्रामीण भागात राबविण्यात येते. साक्षर करणे, त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा प्रदान करेन, पाळणा घर व्यवस्था, सकस आणि पौष्टिक आहार, आरोग्य, स्वच्छता माहिती जागरुकता निर्माण करणे याकरिता योजना आहे.

**३. मुलगा-मुलगी भेदभाव:-** समान वागणूक देणे. लिंग अनुपात प्रमाणात तफावत असू नये. या करिता सरकार विशेष प्रयत्न करावे.

४. आर्थिक मदत, व्यवसाय, उद्योगाकरीता भांडवलाची गरज असते. सरकारद्वारे काही योजना राबविणे गरजेचे आहे. जेणेकरून भांडवलाची कमी ही जाणीव दूर होईल.

५. **साक्षरतेचे प्रमाण**:- अजूनही मुलींना साक्षर केले जात नाही. साक्षरतेअभावी बराचश्या स्त्रिया मागे पडतात, त्यांना प्रौढ शिक्षण द्वावे.

**६. विविध कायदे:-** महिलांच्या सुरक्षिततेकरीता कायदे तयार करावे. जेणेकरुन त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहकाऱ्याकडून होणार नाही.

**निष्कर्ष:-**

**१. कुटुंब विरोध:-** महिलांच्या विकासात कधी कधी घरातूनच अडचण येतो. शिक्षणास विरोध, बाहेर पडण्याला विरोध होतो, त्यामुळे विकासात अडथळा येतो.

**२. उद्योजकता विकास:-** महिलांसाठी सरकारद्वारे योजना तयार करुन त्यांना प्रेरित केले जाते. त्यामुळे त्यांचा व्यवस्थापनातील सहभाग वाढेल.

**३. समाज दडपण:-** स्त्रिया घराबाहेर पडण्यास समाजामुळे तयार होत नाही. समाजात आपली बदनामी होईल ही भीती तिला असते.

**४. वेळेचे नियोजन:-** कुटुंब, उद्योग यामध्ये ती कुटुंबाला जास्त वेळ देणे व व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होते. काही स्त्रिया या कारणास्तव पुढे येत नाही.

**५. जागरूकता अभाव:-** महिलांकरिता उद्योग जगतात पुरेश्या संधी आहे, सरकारी योजना आहेत याबद्दल त्यांना माहिती नसते व मार्गदर्शनाच्या अभावामुळे त्या मागे पडतात.

**६. सहकार्य अभाव:-** एक स्त्री म्हणून व्यवसायिक महिलेकडे बघितल्यास तिला प्रशासनाकडून मदत मिळत नाही व तिची कार्यक्षमता घटते.

**गृहीतक:-** घेतलेले गृहीतक सत्य साबित झाले आहे. वर्तमान स्तिथीत स्त्रिया या व्यवस्थापनात मोठया प्रमाणात आहेत ज्यामुळे ती स्वावलंबी झाली आहे व आर्थिक विकासही होत आहे. या ठिकाणी गृहीतक सत्य झाले आहे.

## संदर्भग्रंथ:-

१. वृत्तपत्र

२. मासिके.

३. उद्योजकता विकास – डॉ. येवले, डॉ. दिलीप पाटील, डॉ. दिनेश भक्कड

४. कौशल्य विकास – डॉ. देहलीवाल